**<u>राज्यात हरित एकात्मिक डेटा सेंटर</u>**
**<u>पार्कस स्थापित करण्याबाबत .</u>**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:- मातंधो -२०२४/ प्र.क्र. १३८/ उद्योग-२**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ०९ ऑक्टोबर, २०२४

**वाचा :-** शासन निर्णय क्र. मातंधो २०२३/प्र.क्र १७०/उद्योग-२, दिनांक २७/०६/२०२३

**<u>प्रस्तावना</u> :-**

महाराष्ट्र औद्योगिक धोरण-२०१९ मध्ये "एकात्मिक डेटा सेंटर पार्कस" क्षेत्र हे प्राधान्य क्षेत्र (Thrust Sector) म्हणून ओळखले गेले आहे. माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण २०२३ अंतर्गत एकात्मिक डेटा सेंटर पार्क आणि घटक यांना राज्य शासनाकडून थेट सहकार्य आणि प्रोत्साहन देण्यात येते. देशामध्ये मुंबई शहरात समुद्रमार्गे येणाऱ्या सर्वात जास्त संदेश वाहन्यांचे स्टेशन्स स्थित असून, त्याद्वारे आशिया पॅसीफीक हा भाग जगातील पूर्व-पश्चिम भागाला जोडला गेला आहे. जागतिक बाजार विस्ताराकरीता हा सर्वात मोठा दुवा आहे. निती आयोगाने राज्य शासनाच्या सहकार्याने मुंबई महानगर प्रदेशाला एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवण्याचा अहवाल नुकताच प्रकाशित केला आहे. त्यामध्ये मुंबई महानगर प्रदेश हा एकात्मिक डेटा सेंटर पार्कस हब आणि त्यातही हरित डेटा सेंटर हब म्हणून स्थापित होऊ शकतो असे आधोरेखित केले आहे. शाश्वत वीज पुरवठा, समुद्राखालील केबल लँडिंगची सुविधा आणि प्रशिक्षित तांत्रिक मनुष्यबळाची उपलब्धता या बाबींमुळे झोन-१ (मुंबई व नवी मुंबई) हे आशिया-पॅसिफिक मधील डेटा सेंटर हब म्हणून विकसित होत आहे. राज्याला $१ ट्रिलियन GSDP चे आकांक्षी लक्ष्य साध्य करण्याच्या अनुषंगाने एक तपशीलवार रोडमॅप तयार करण्यासाठी राज्याने आर्थिक सल्लागार परिषदेची (EAC) स्थापना केली आहे. आर्थिक सल्लागार परिषदेनेही त्यांच्या शिफारशीमध्ये डेटा सेंटर हे महत्वाचे क्षेत्र असल्याचे नमूद केले आहे.

देशाची अर्थव्यवस्था ७ टक्क्यांहून अधिक दराने वाढत असून डेटा प्रोसेसिंग आणि स्टोरेजसाठी बाजारपेठेत उल्लेखनीय मागणी आहे. कृत्रिम बुध्दीमत्ता (AI) च्या आगमनाने डेटा स्टोरेज आणि प्रक्रियेची आवश्यकता अनेक पटींनी वाढणार आहे. परंतु याच बरोबर डेटा सेंटरद्वारे जास्त प्रमाणात वापरण्यात येणा-या ऊर्जेमुळे ग्लोबल वॉर्मिंगची एक मोठी चिंता आहे. या कारणास्तव अनेक बहु-राष्ट्रीय दिग्गज कंपन्यांनी उदा. Amazon, Google, Microsoft इ.,त्यांचा डेटा हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्कमध्ये साठविण्याविषयी संकेत दिले आहे. याकरिता "हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्कस" ची संकल्पना प्रस्तावित करण्यात येत आहे. यानुसार कंपनी स्वतःच्या वापरासाठी आणि/किंवा विकासक इतर डेटा सेंटर घटकांकरीता टियर ४ स्तराचे डेटा सेंटर विकसित करतील आणि विविध डेटा सेंटर कंपन्या सदर सुविधेतील यंत्रसामुग्रीसह डेटा स्टोरेज स्पेसचा वापर करतील.

राज्य शासन माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण-२०२३ अंतर्गत डेटा सेंटरसना प्रोत्साहन देण्यासाठी उत्सुक असून वरील धोरणांतर्गत झोन-१ मधील शहरात विशेषतः मुंबई आणि नवी मुंबई क्षेत्राला डेटा सेंटर हब म्हणून विकसित करण्याचे राज्य शासनाचा मानस आहे. भारताच्या एकूण डेटा सेंटर क्षमतेमध्ये मुंबई / नवी मुंबईचे अग्रस्थान कायम ठेवण्यासाठी आणि मुंबईला 'डेटा सेंटर कॅपिटल ऑफ इंडिया' बनविण्यासाठी सदर धोरणांतर्गत विविध आकर्षक प्रोत्साहने देय करण्यात आली आहेत. हि वस्तुस्थिती विचारात घेता, माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण २०२३ मध्ये अंशत: सुधारणा करुन

त्यामध्ये तीन (३) हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्कस उभारुन त्यांना अतिरिक्त प्रोत्साहने देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**<u>शासन निर्णय:-</u>**

एकात्मिक डेटा सेंटर पार्कस" हे एक प्राधान्य क्षेत्र (Thrust ) असून वाढत्या औद्योगिकीकरणासह राज्याच्या एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी या क्षेत्राचा विकास महत्त्वपूर्ण आहे. तथापि डेटा सेंटरद्वारे जास्त प्रमाणात वापरण्यात येणा-या ऊर्जेमुळे ग्लोबल वॉर्मिंगची मोठी चिंता असल्याने "हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्कस" ची संकल्पना प्रस्तावित करण्यात आली आहे. हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्कस स्थापन करण्यासाठी अपारंपारिक ऊर्जा निर्मिती, पुरवठा जाळे आणि इतर पायाभूत सुविधा उभारणे इत्यादी बाबी समाविष्ट असल्याने ही अत्यंत खर्चिक बाब आहे. माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण २०२३ अंतर्गत डेटा सेंटर पार्कस व घटकांकरिता प्रोत्साहने व सोईसवलती लागू केल्या आहेत. ही सर्व प्रोत्साहने व सोईसवलती प्रस्तुत हरित एकात्मिक डेटा सेंटरमधील विकासक व घटकांना लागू राहतील. याशिवाय हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्कसना अतिरिक्त प्रोत्साहने पुढे नमूद केल्याप्रमाणे अनुज्ञेय करण्यात येत आहेत. त्यामुळे प्रचलित माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण २०२३ मध्ये अंशत: सुधारणा करुन, खालीलप्रमाणे त्यामधील तीन (३) हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्कस उभारण्यासाठीच्या व्याख्या, पात्रता, अटी, शर्ती, सवलती व अतिरिक्त प्रोत्साहने अनुज्ञेय करण्यात येत आहेत :-

**२. हरित एकात्मिक डेटा सेंटरची व्याख्या व पात्रता खालीलप्रमाणे आहे- :**

- **हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्कची व्याख्या :-** “ सदर धोरणाच्या उद्देशाने, हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्कची व्याख्या माहिती तंत्रज्ञानच्या पायाभूत सुविधेसह अशी करण्यात आली आहे. जी उच्च ऊर्जा कार्यक्षम आणि त्याचा पर्यावरणीय प्रभाव कमी करण्यासाठी डिझाइन केलेला डेटा संचयित, व्यवस्थापित आणि प्रसारित करण्यासाठी सर्व्हर होस्ट करते. सदर धोरणांतर्गत प्रोत्साहनासाठी पात्र होण्यासाठी अशा प्रकारचे डेटा सेंटर पार्क त्यांच्या मूळ डेटा सेंटर क्रियाकलापांसाठी १००% हरित ऊर्जा वापरतील. हे हरीत डेटा सेंटर पार्कस हरित ग्रीडने विकसित केलेल्या वीज वापर परिणामकारकता (PUE) आणि कार्बन वापर परिणामकारकता (CUE) या दोन मेट्रिक्सच्या दृष्टीने अत्यंत कार्यक्षम असावेत. या डेटा सेंटरच्या इमारती किमान LEED सिल्व्हर ग्रेडच्या असाव्यात. या हरित डेटा सेंटर्सकरीता अनुज्ञेय प्रोत्साहनांसाठी स्थिर भांडवली गुंतवणुकीची पात्रता पूर्ण करणाऱ्या डेटा आणि त्याच्या स्टोरेजसाठी या सुविधेमध्ये वापरल्या जाणाऱ्या इमारती, प्लांट आणि मशिनरी/उपकरणांमध्ये गुंतवणूक या बाबींचा समावेश राहील”.

- **Definition of a Green Integrated Data Center Park** :- “For the purpose of this Policy, Green Integrated Data Centre Park is defined as facility including IT infrastructure that hosts servers to store, manage and disseminate data that has been designed to be highly energy efficient and to minimize its environmental impact. Such type of Data Centre Parks shall use 100% Green Energy for its core Data Centre activities, to be eligible for the incentives under this Policy. These Green Data Centre Parks should be very efficient in terms of two metrics, namely Power Usage Effectiveness (PUE) and Carbon Usage Effectiveness (CUE) developed by the Green Grid. It is expected that the buildings of these Data Centres should comply atleast LEED Silver Grades norms. Fixed capital investment eligible for incentives for these Green Data Centres will include investment in building, Plant and Machinery/Eqipments used in this facility for data and its storage”.

- **पात्रता :-**

| **अ.क्र.** | **निकष** | **तपशिल** |
|---|---|---|
| १ | प्रकल्पांची संख्या | कमाल प्रकल्प ३ |
| २ | क्षमता | किमान मेगा ५००वॅट |
| ३ | स्थिर भांडवली गुंतवणूक | किमान रु ३०,०००.कोटी |
| ४ | गुंतवणूक कालावधी | वर्ष १० |
| ५ | प्रोत्साहन कालावधी | वर्ष २० |

प्रस्तावित हरित एकात्मिक तीन (३) डेटा सेंटर पार्कस प्रकल्पांना वरीलप्रमाणे पात्रतेचे निकष लागू राहतील.

**३. राज्यात "हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्कस" स्थापित होण्याकरिता अटी व शर्ती तसेच सवलती खालीलप्रमाणे आहेत :-**

माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण -२०२३ च्या कालावधीत, टियर ४ श्रेणीचे खालीलप्रमाणे किमान स्थिर भांडवली गुंतवणूक असणारे फक्त पहिले तीन (३) एकात्मिक डेटा सेंटर पार्कस प्रकल्प लाभासाठी पात्र असतील. त्यासाठी खालीलप्रमाणे अटी व शर्ती तसेच सवलती लागू केल्या जातील :-

i) हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्कससाठी निश्चित स्थिर भांडवली गुंतवणूकीमध्ये विकासक आणि वापरकर्त्या कंपन्यांची इमारत, प्लांट आणि यंत्रसामग्रीचा समावेश असेल. विकासकाची कंपनीची इमारत, प्लांट आणि यंत्रसामग्री यामध्ये रु. १०,००० कोटी किमान गुंतवणूक असणे तसेच विकासकाने हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्क मधील मुख्य प्रक्रिया (Core Data center Activities) करिता १००% हरित ऊर्जेचा वापर करणे आवश्यक आहे .

ii) हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्कला कार्यान्वित कालावधीत (operative period) स्थिर भांडवली गुंतवणूकीची पातळी कायम राखावी लागेल अन्यथा प्रोत्साहन प्रमाणामध्ये वसूल केले जातील.

iii) हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्क कार्यान्वयन कालावधी पूर्ण होईपर्यंत कार्यरत असावेत. डेटा सेंटर पार्कला देण्यात येणा-या शेवटच्या प्रोत्साहनाच्या तारखेपासून कार्यान्वयन कालावधी किमान १० वर्षांसाठी असेल.

iv) स्थिर भांडवली गुंतवणूक निकषांची पुर्तता करणा-या पात्र नवीन हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्कसना त्यांच्या सह-स्थानातील गुंतवणूकीसह किमान रु. १०,००० कोटींची गुंतवणूक केल्यानंतरच प्रोत्साहने दिली जातील.

v) हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्कसचा वापर अनुज्ञेय करण्यापूर्वी विकासकास संबंधित नियोजन प्राधिकरणाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील. तसेच हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्कसच्या प्रयोजनासाठी इमारतींच्या बांधकाम प्रस्तावामध्ये मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये अन्य तरतुदीं लागू राहतील.

vi) हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्क प्रकल्पांना डीजी सेट, कॉमन इन्फ्रास्ट्रक्चर, युटिलिटीज इत्यादी चालवण्यासाठी हरित ऊर्जा व्यतिरिक्त जास्तीत जास्त १०% इतर इलेक्ट्रिक ऊर्जा वापरता येईल.

vii) दिनांक २७ जून २०२३ अन्वये जाहीर करण्यात आलेल्या महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण २०२३ अंतर्गत विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) यासाठी

निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांच्या धर्तीवर वीज निर्मिती युनिट्सद्वारे वीज निर्मिती आणि वितरणाशी संबंधित घटकांना परवानगी अनुज्ञेय करण्यात आली आहे. तसेच केंद्र शासनाच्या SEZ अधिनियमाच्या कलम ४९ च्या धर्तीवर डेटा सेंटर पार्क प्रकल्पांना वीज निर्मिती प्रकल्प वितरण परवाना मिळण्यासाठी राज्य शासनातर्फे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे (MERC) शिफारस करण्यात येईल. मानीव वितरण परवाना धारक डेटा सेंटर पार्क प्रकल्पांनी हरित नवीकरणीय ऊर्जेपासून शोधण्यायोग्य आधारावर ५१% इलेक्ट्रॉन्सचे स्रोत सुनिश्चित करणे गरजेचे राहिल.

viii) हरित एकात्मिक डेटा सेंटरच्या कार्यान्वयन खर्चात विजेचा मोठा वाटा असल्याने प्रकल्पाला ओपन ऍक्सेसद्वारे वीज मिळण्याची परवानगी दिली जाईल.

ix) हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्क प्रकल्पासाठी नॉन पीक अवर (non-peak hour) मध्ये वापरलेल्या पॉवर बँकिंग चार्जेसवर MERC च्या नियमावलीनुसार माफी सवलत अनुज्ञेय करण्यात येईल.

x) महाराष्ट्र औद्यागिक विकास महामंडळ क्षेत्रामध्ये स्थापित होणा-या हरित डेटा सेंटर पार्कमधील घटकांना प्रथम सबलेटिंग चार्जेस तसेच इतर कोणतेही अतिरिक्त शुल्क न आकारता विनामूल्य परवानगी दिली जाईल.

xi) हरित एकात्मिक डेटा सेंटर प्रकल्पासाठी जास्तीत जास्त ७०% ग्राउंड कव्हरेज अनुज्ञेय राहील आणि नॅशनल बिल्डिंग कोड आणि विकास नियंत्रण नियमावलीनुसार (DCR) अनुज्ञेय मर्यादेत फ्लोअरपासून छताच्या उंचीचे कोणतेही निर्बंध राहणार नाहीत.

xii) हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्क प्रकल्पांना त्यांच्या प्रकल्पाच्या ठिकाणापर्यंत माफक दरात २४ X ७ अखंड पाणी पुरवठा पुरविला जाईल.

xiii) शासनातर्फे हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्क प्रकल्पांना समर्पित दोन स्वतंत्र वीज पुरवठा फीडर / सबस्टेशनद्वारे (STU System OR CTU System) पुरेसा वीज पुरवठा उपलब्ध करण्यात येईल.

xiv) सध्याच्या नियमांनुसार प्रति ४०० चौरस मीटर बांधीव क्षेत्रासाठी (BUA) एक पार्किंग आवश्यक आहे, तथापि हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्ककरिता १ पार्किंग/१००० चौरस मीटर बांधीव क्षेत्रासाठी (BUA) याप्रमाणे पार्किंगचे नियम शिथिल केले जातील.

xv) हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्कला सीमा भिंतींसाठी ३.६ मीटर उंची पर्यंत बांधकाम करणे अनुज्ञेय राहील.

xvi) हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्कला चिलर्स उपकरणे छतावर स्थापित करणे अनुज्ञेय राहील.

xvii) हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्कमधील अंतर्गत रस्त्याची रुंदी प्रचलित आग आणि सुरक्षा नियमांनुसार अनुज्ञेय राहील.

xviii) हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्कसाठी आवश्यक रिक्रिएशनल ग्राउंड (RG) करिता राखीव भूखंड क्षेत्राच्या ५० टक्के क्षेत्रामध्ये भूमिगत अग्निशमन पाण्याच्या टाक्या स्थापित करणे अनुज्ञेय राहील.

**४. हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्क प्रकल्पांना अतिरिक्त प्रोत्साहने खालीलप्रमाणे आहेत :-**

प्रकल्पाची मोठ्या प्रमाणावरील गुंतवणूक, अद्ययावत तंत्रज्ञान आणि हरित प्रकल्प या बाबी लक्षात घेता राज्यात स्थापित होणाऱ्या प्रथम तीन हरित एकात्मिक डेटा सेंटर प्रकल्पांना क्षेत्राची मर्यादा न ठेवता पात्र प्रकल्पांना माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभत सेवा धोरण २०२३ अंतर्गत अनुज्ञेय असलेल्या प्रोत्साहनांबरोबर पुढीलप्रमाणे अतिरिक्त प्रोत्साहने अनुज्ञेय करण्यात येत आहेत :-

| अ.क्र. | प्रोत्साहन | तपशिल |
|---|---|---|
| १ | एकूण वित्तीय प्रोत्साहने | प्रकल्पाच्या एकूण पात्र स्थिर भांडवली गुंतवणूकीच्या ५० टक्के मर्यादेत २० वर्षासाठी प्रोत्साहने अनुज्ञेय राहतील तसेच प्रोत्साहनांची प्रतिवर्ष कमाल मर्यादा ५ टक्के प्रमाणे राहील. |
| २ | मुद्रांक शुल्क माफी | माहिती तंत्रज्ञान धोरण २०२३ प्रमाणे डेटा सेंटर पार्क प्रकल्पासाठी लागणाऱ्या जमीनीच्या कराराच्या दस्तऐवजावर आणि प्रकल्प स्थापनेसाठी घेतलेल्या मुदत कर्जावर (Term Loan) १०० टक्के मुद्रांक शुल्क माफी अनुज्ञेय आहे. तसेच डेटा सेंटर पार्क अंतर्गत स्थापित होणा-या घटकांना पहिला भाडेपट्टा/ पोट भाडेपट्टा यावर १०० टक्के मुद्रांक शुल्क माफी अनुज्ञेय राहील. |
| ३ | विद्युत शुल्क माफी | २० वर्ष |
| ४ | वीज वापर अनुदान झोन-१ मध्ये अनुज्ञेय करणे. | हरित एकात्मिक डेटा सेंटरद्वारे वापर करण्यात आलेल्या हरित ऊर्जेवर रु.१ प्रति युनिट प्रमाणे १० वर्षासाठी अनुदान अनुज्ञेय राहील. |
| ५ | औद्योगिक प्रोत्साहन अनुदान | • हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्क उभारण्यासाठी खरेदी करण्यात आलेल्या प्लान्ट आणि यंत्रसामुग्री वरील १०० टक्के स्थूल राज्य वस्तू व सेवा कराच्या (SGST) समतुल्य अनुदान अनुज्ञेय राहील.<br>• डेटा सेंटरच्या राज्यांतर्गत संबंधित पात्र सेवांच्या (Operational Expenses) पुरवठ्यावर देय १०० टक्के स्थूल राज्य वस्तू व सेवा कराच्या (Gross SGST) समतुल्य अनुदान अनुज्ञेय राहील.<br>• इमारत व इतर पूरक पायाभूत सुविधांच्या बांधकामावरील १०० टक्के स्थूल राज्य वस्तू व सेवा कराच्या (Gross SGST) समतुल्य अनुदान अनुज्ञेय राहील. |

**५.** तीन (३) हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्कस उभारण्याकरीता अतिरिक्त प्रोत्साहने अनुज्ञेय करण्यासाठी त्यांना परि. ३ मधील अटी, शर्ती व सवलती तसेच नियमित प्रोत्साहनांबरोबर परि. ४ मधील नमूद अतिरिक्त प्रोत्साहने देय करण्याकरीता मान्यता देण्यात येत आहे.

**६.** हरित एकात्मिक डेटा सेंटर प्रकल्पांसह सर्वच डेटा सेंटर प्रकल्पांसाठी विद्युत शुल्क माफी कमाल २० वर्ष कालावधीसाठी अनुज्ञेय करण्यात येत आहे.

**७.** हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्कसच्या प्रति प्रकल्प किमान ५०० मे.वॅट क्षमतेपैकी प्रति प्रकल्प किमान २ टक्के क्षमता ही राज्य शासनाच्या प्रयोजनार्थ राखीव ठेवणे बंधनकारक राहील.

**८.** माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण २०२३ मध्ये नमूद केलेली मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील शक्ती प्रदान समितीची कार्यकक्षा ही सदर धोरणाला लागू राहील.

**९.** हरित एकात्मिक डेटा सेंटर ही नवीन संकल्पना असून, बदलत्या सुधारीत तंत्रज्ञानानुसार कालानुरूप अटी व शर्तीमध्ये बदल करणे आवश्यक असल्याने, असे बदल करण्याचे अधिकार उद्योग विभागास राहतील व या संदर्भात निर्गमित केलेली मार्गदर्शक तत्वे हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्कसना बंधनकारक राहतील.

**१०**. हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्कसना मंजूरी देणे तसेच त्यासाठी मंजूर अतिरिक्त प्रोत्साहने सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत प्राप्त निधीमधून प्रचलित कार्यपध्दतीनुसार अदा करण्यास उद्योग विभागास मान्यता देण्यात येत आहे. वरील प्रोत्साहने हे सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत लेखाशीर्षाखालील प्राप्त निधीमधून वितरीत करण्यात यावेत.

**११**. राज्यात पहिले तीन (३) हरित एकात्मिक डेटा सेंटर प्रकल्प स्थापन झाल्यानंतर सदरची योजना आपोआप संपुष्टात येईल.

**१२**. सदर शासन निर्णय दिनांक ०४/१०/२०२४ रोजी मा. मंत्रिमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

**१३**. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संगणक संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२४१००९१११३८५०९६१० असा आहे. हे शासन ज्ञापन डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY SHAMKANT DEGAONKAR

Digitally signed by SANJAY SHAMKANT DEGAONKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT, 2.5.4.20=de0a2ca7914a3c02f24aa23655f609f41f2d36b0ec57da4c71f19aaf08230a79, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=56CF8C8577584ADC42F070185C585C41084CC34F6683553D21CCACBFA33D4D1F, cn=SANJAY SHAMKANT DEGAONKAR
Date: 2024.10.09 17:05:38 +05'30'

**(संजय देगांवकर)**
**सह सचिव (उद्योग), महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई.
४. मा.उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई.
५. मा.मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा.अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
८. मा.सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधानभवन, मुंबई.
९. मा.उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
१०.मा.उपसभापती, विधान परिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
११.मा.विरोधी पक्षनेता,महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
१२. मा.विरोधी पक्षनेता,महाराष्ट्र विधान परिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,विधानभवन, मुंबई.
१३.अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४.अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग,मंत्रालय, मुंबई
१५.अपर मुख्य सचिव (ऊर्जा), उद्योग,ऊर्जा,कामगार व खनिकर्म विभाग,मंत्रालय,मुंबई
१६. अपर मुख्य सचिव, महसूल विभाग,मंत्रालय,मुंबई

१७. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.
१९. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी (पूर्व), मुंबई.
२०. सर्व महानगरपालिका आयुक्त.
२१. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेड, मुंबई.
२२. व्यवस्थापकीय संचालक, शहर औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.
२३. महानिरीक्षक, नोंदणी व नियंत्रक, मुद्रांक शुल्क, पुणे.
२४. निमंत्रक, उद्योग मित्र, मुंबई.
२५. उप महानिरीक्षक,मुद्रांक शुल्क, मुंबई.
२६. मंत्रालयीन विभागातील सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी.
२७. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
२८. प्रधान सचिव (उद्योग) यांचे स्वीय सहाय्यक, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई.
२९. सह सचिव (उद्योग-२) यांचे स्वीय सहाय्यक, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई.
३०. निवड नस्ती (उद्योग-२)